20 APR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘आयआयएससी’सोबत विद्यापीठ राबविणार संशोधन प्रकल्प

## विद्यापीठाचे मोठे यश : संशोधकीय दर्जावर राष्ट्रीय मोहोर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ देशातील आघाडीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर यांच्याशी ‘स्पोक’ म्हणून जोडले जात आहे. देशातील अवघ्या ३२ राज्य अकृषी विद्यापीठांपैकी शिवाजी विद्यापीठ एक ठरले आहे. विद्यापीठाच्या संशोधकीय दर्जावर या निमित्ताने राष्ट्रीय मोहोर उमटली आहे. केंद्रीय मंत्रालयाचे सचिव प्रा. अभय करंदीकर यांनी संबंधित शैक्षणिक संस्थांसमवेत ऑनलाईन बैठक घेऊन ही घोषणा केली.

भारतीय विद्यापीठांची संशोधन व विकासाची क्षमता वाढवण्यासाठी केंद्राने स्थापित केलेल्या अनुसंधान नॅशनल रिसर्च फौंडेशनच्या अंतर्गत पार्टनरशीप फॉर ॲक्सिलरेटेड इनोव्हेशन अँड रिसर्च हा महत्वाकांक्षी उपक्रम सुरू केला.

तरुण भारत

विद्यापीठातून

देशातील उच्चस्तरीय संस्था आणि उदयोन्मुख संशोधन क्षमता असलेल्या विद्यापीठांमध्ये परस्पर संशोधन सहकार्य वाढवणे असा उद्देश आहे. पेअर कार्यक्रम हब–अँड–स्पोक मॉडिलद्वारे कार्य करेल. नोडल ‘हब’ म्हणून काम करणारी केंद्रीय संस्था देशभरात संशोधन आणि नवोपक्रम चालविण्यासाठी किमान सात संस्थांशी भागीदारी करेल. एन.आय.आर.एफ. रँकिंगमध्ये पहिल्या स्थानी असलेल्या बंगळूरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाची निवड केली. पहिल्या टप्प्यात सात उच्चस्तरीय संस्थांची नावे ‘हब’ म्हणून जाहीर केली. त्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्ससह आयआयटी–इंदोर, आयआयटी–मुंबई, आयआयटी–रोपार, एनआयटी– रुरकेला, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली आणि केंद्रीय विद्यापीठ, हैदराबाद यांचा समावेश आहे. त्यांच्यासमवेत ‘स्पोक’ म्हणून संशोधनकार्य करण्यासाठी एकूण ४३ शैक्षणिक संस्थांची निवड केली. त्यात ३२ राज्य अकृषी विद्यापीठे, ६ केंद्रीय विद्यापीठे आणि ७ एनआयटी यांचा समावेश आहे.

### प्रत्येक नेटवर्कला शंभर कोटींचा निधी

या प्रकल्पांतर्गत प्रत्येक हब–अँड–स्पोक नेटवर्कला १०० कोटी रुपयांचा निधी केंद्राकडून देण्यात येणार आहे. यातील ३० टक्के निधी हब म्हणून काम करणाऱ्या संस्थेला आणि ७० टक्के निधी स्पोक म्हणून निवडलेल्या संस्थांसाठी असेल. हब असणारी संस्था आपल्याशी जोडलेल्या स्पोक संस्थांना संशोधकीय मार्गदर्शनाबरोबरच आवश्यक संसाधने, उपकरणे आणि सुविधा देतील. त्यामुळे भारतभरात संशोधनाची एक सक्रिय अशी परिसंस्था निर्माण होणे अभिप्रेत आहे. शिवाजी विद्यापीठ ॲडव्हान्स्ड मटेरियल सायन्समधील आधुनिक संशोधन करणार आहे. त्यात नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, संगणकशास्त्र, संख्याशास्त्र आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट या अधिविभागांतील संशोधकांचा सहभाग आहे.

### शिवाजी विद्यापीठाच्या दर्जेदार संशोधनकार्यावर शिक्कामोर्तब

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ‘पेअर’सारख्या देशातील महत्वाकांक्षी संशोधकीय उपक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठाची निवड होणे ही बाब अभिमानास्पद आहे. पण, त्याचबरोबर देशातील रँकिंगमध्ये क्रमांक एकवर असलेल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सबरोबर स्पोक म्हणून संशोधन करण्याची संधी मिळणे ही विद्यापीठाच्या संशोधकीय दर्जावर शिक्कामोर्तब करणारी आहे. ‘आयआयएससी’सारख्या दिग्गज संस्थेसोबत संशोधन करण्याची संधी शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना व विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

20 APR 2025

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्राहक चळवळीच्या कार्याची व्याप्ती वाढवावी - प्रकाश आबिटकर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** ग्राहकांना अहोरात्र वेगवेगळ्या माध्यमातून जागृतीचे काम ग्राहक पंचायतीच्या माध्यमातून होत असते. संघटनेने कार्याची व्याप्ती अजून वाढवावी. जेणेकरून समाजासाठी ते अधिक उपयुक्त होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित ग्राहक कार्यकर्ता एक दिवसीय कार्यशाळेवेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रभारी कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन शिंदे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त उदय लोहोकारे, डॉ. आर. जी. पवार, ग्राहक पंचायतीचे राज्य सचिव अरुण वाघमारे, राज्याचे कोषाध्यक्ष सुनिता राजेघाटगे,




**ग्राहक कार्यकर्ता एक दिवसीय कार्यशाळेवेळी बोलताना पालकमंत्री प्रकाश आबिटकर.**

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष प्रवीण खोत, ग्राहक पंचायत जिल्हा अध्यक्ष बी.जे. पाटील उपस्थित होते.

पालकमंत्री आबिटकर म्हणाले, स्वर्गीय बिंदुमाधव जोशी यांच्या मांडलेल्या विचारातून ग्राहकांसाठी राज्य -देशभरात ग्राहक चळवळ संघटित झाली. ग्राहकांची तक्रार आल्यावर त्यास लवकर न्याय मिळण्यासाठी ग्राहक पंचायत चळवळीचे काम अधिक गतिमान करावे. यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी राज्य शासन आपल्या पाठीशी आहे.